# अपेक्षा ठरवताना

पूर्वी 'पाहून लग्न करताना मुलगा/मुलगी नीट बघता येईल, त्यांचे घराणे बघता येईल, आर्थिक स्थिती तपासून घेता येईल' अशा सामाजिक आर्थिक- सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अरेंज मॅरेजकडे बघितलं जात असे. आजही यात मूलभूत स्वरूपाचा बदल झालेला नाही. आजही लग्न ठरवण्याची प्रक्रिया मूळाशी कुठेतरी तीन 'प' वर आधारलेली आहे. पगार-पत्रिका-परिवार हे ते त्रिकूट! यातल्या पहिल्या दोन गोष्टींना प्रमाणाबाहेर महत्त्व मिळताना दिसतं आणि तिसऱ्या बाबतीत कुटुंबाच्या मूल्यव्यवस्थेपेक्षा, जीवनशैलीपेक्षा जात-पोटजातींचाच विचार अधिक होतो. पण गेल्या वीस- पंचवीस वर्षात आपल्या देशात आणि समाजात, विशेषतः शहरी सुशिक्षित वर्गात जे बदल, ज्या वेगाने झाले आहेत ते बघता विवाह या गोष्टीकडे पारंपारिक दृष्टीकोनातून बघणे फारसे शहाणपणाचे नाही.

लग्नाला उभा मुलगा पसंत करताना पूर्वी 'होतकरू तरुण' हा शब्द हमखास वापरला जायचा. आजकाल हा किंवा या आशयाचा शब्द कुठेच ऐकू येत नाही. होतकरू म्हणजे ज्याच्यात क्षमता आहेत असा. धडपड करून, कष्ट करून, स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर, चिकाटीच्या जोरावर यश संपादन करू शकेल अशी क्षमता असणारा मुलगा हा आपल्या मुलीचा हात देण्यासाठी अगदी योग्य मानला जायचा. आता क्षमता आहेत किंवा नाहीत या गोष्टी मागे पडल्या आणि आधीच यश संपादन केलेला मुलगाच हवा हा अट्टाहास सुरु झाला. म्हणजे त्या मुलाचा पगार, त्याची गाडी, त्याच्या नावावर फ्लॅट असणे या गोष्टींना महत्त्व दिलं जाऊ लागलं. रेडीमेड हवं सगळं. आणि हा दोष मुलींचा नाही फक्त. त्यांच्या पालकांचाही आहे हे मी अगदी स्पष्टपणे सांगते. आपल्या मुलीला लग्न झाल्यावर जराही तोशीस पडता कामा नये, तिचा कम्फर्ट झोन जराही मोडता कामा नये अशी चमत्कारिक अपेक्षा पालक ठेवताना दिसतात. आपल्या मुलीला सर्व सुख मिळवीत या इच्छेत काही चूक नाही. प्रेमापोटीच ही इच्छा तयार होते. पण यामुळे होतं असं लग्नाच्या बाबतीत अपेक्षा ठरवताना आपण आपल्या मुलीला बदलांना तयार करण्याऐवजी सगळं 'जसंच्या तसं कसं राहील' ते बघण्याचा सल्ला देतो नकळतच. इंग्रजीत एक म्हण आहे- 'Magic happens where comfort zone ends'. शाळेतून कॉलेजमध्ये जातो, नंतर नोकरीला लागतो, एक कंपनी बदलून दुसरीकडे नोकरी करू लागतो अशा अनेक बदलांच्या वेळी आपण आपला कम्फर्ट झोन सोडत असतो. स्वतःच्या व्यक्तिगत प्रगतीसाठी हे आवश्यकच असतं. त्यामुळे लग्नाच्या निमित्ताने होणाऱ्या बदलांकडे, कम्फर्ट झोन सोडायला लागणाऱ्या घटनेकडे अतिशय सकारात्मकपणे बघण्याची गरज आहे. एका बाजूला आपण पालक अत्यंत अभिमानाने सांगतो की आपल्या संसारात अगदी चमचा सुद्धा आपण एकेक करत जमवला आहे, सगळं कष्टाने उभं केलं आहे. हे करत असताना आपण धडपडलो असू, पण माणूस म्हणून आपल्याला समृद्ध करण्यात याच अनुभवांचा तर हात आहे. आग आपल्या मुलामुलींना सगळं रेडीमेड देण्याचा किंवा मिळालं पाहिजे असा अट्टाहास आपण का बरं धरतो?

मुलींकडेच्या मंडळींच्या अपेक्षा मुलाच्या पगारापाशी अडकून पडल्या असताना मुलांचा आणि त्यांच्या पालकांचा अपेक्षा ठरवताना होणारा गोंधळही चिंतेची बाब आहे. वीस वर्षांपूर्वी मुलं ज्या पद्धतीची अपेक्षा सांगायचे, त्याच पद्धतीच्या अपेक्षा आजही सांगताना दिसतात. 'मनमिळाऊ, दिसायला चांगली, जुन्या-नव्याचा संगम साधणारी' इ. आता वीस वर्षात पृथ्वीने वीस वेळा सूर्याला प्रदक्षिणा मारली आहे, देशात आणि समाजात प्रचंड बदल झाले आहेत. बदललेल्या परिस्थितीत मुलींच्या अपेक्षा समजून घेऊन, त्याहीपेक्षा नव्या पिढीच्या बदललेल्या जीवनशैलीला समजून घेऊनच मुलाने आपल्या बायकोबद्दलच्या अपेक्षा ठरवायला हव्यात. शिवाय मला तर अनेकदा असं जाणवतं की मुलाच्या

बायकोबद्दलच्या असणाऱ्या अपेक्षा आणि मुलाच्या आईच्या सुनेबाबत असणाऱ्या अपेक्षा यात फारच अंतर आहे. लग्नासाठी अनुरूप जोडीदार शोधाचा प्रवास सुरु करण्याआधी अपेक्षांच्या बाबतीत आपल्या स्वतःच्या मनात पुरेशी स्पष्टता असणं गरजेचं असतं.

मी जेव्हा विवाहोत्सुक मुला-मुलींशी बोलते तेव्हा मला दिसतो तो त्यांच्या मनात उडालेला गोंधळ. सहजीवनात, संसारात आपली नेमकी भूमिका काय असेल, काय असली पाहिजे याबाबतची स्पष्टता मुलं आणि मुली या दोघांना नाही. आपल्या आई-वडिलांच्या सहजीवनाचे एक मॉडेल त्यांच्यासमोर असतं पण तेही जसंच्या तसं हवं असतं असं नाही. साहजिकच काळानुरूप, परिस्थितीनुसार त्यात बदल हवे असतात. आई जे संसारात करत होती तेच मी माझ्या संसारात करावं असं मुलीला वाटत नसतं पण नवऱ्याने मात्र आपल्या वडिलांनी आपल्याला जसं जपलं-वागवलं तसं असावं असं वाटत असतं. मुलांना अगदी आपल्या आई-वडिलांसारखं सहजीवन हवं असतं पण त्याचबरोबर आधी सांगितल्यानुसार आर्थिक आणि त्यापाठोपाठ आलेल्या सामाजिक रेट्यामुळे कमावणारी बायको हवी असते. बाप रे! केवढा गुंता आहे, नाही? तरी इथे मी हा खूपच सुटसुटीत करून मांडला आहे. व्यक्ती व्यक्तीनुसार यात असंख्य फाटे फुटत जातात, असंख्य कंगोरे असतात. आणि मग आपल्या विचारांचा, आदर्शांचा, मूल्यांचा असा काही गुंता मुला-मुलींच्या डोक्यात तयार होत जातो की त्यात ते पुरते अडकतात. ही चिंता करण्याची गोष्ट नाही. इथून पुढची खरी गंभीर बाब ही की आपण गोंधळात पडलो आहोत, आपण आपल्याच विचारांत असलेल्या अस्पष्टतेमुळे गुंत्यात अडकलो आहोत याची जराही जाणीव कित्येकांना नसते!

आणि इथेच विवाहपूर्व 'समुपदेशन', म्हणजेच कौन्सेलिंग, उपयोगी पडते! समुपदेशकाबरोबर बोलून, आपलेच विचार सुटे होत होत सगळं स्वच्छ-स्पष्ट व्हायला मदत होते. अनुरूप गेली कित्येक वर्ष सातत्याने आपल्या सदस्यांना विवाहपूर्व समुपदेशनाची सोय उपलब्ध करून देत आले आहे. पुण्यातील मुख्यालयात तर ही सोय उपलब्ध आहेच पण त्याबरोबर प्रत्यक्ष येणे शक्य नसणाऱ्यांना आपण फोनवरून आणि इंटरनेट कॉलद्वारादेखील ही सोय उपलब्ध करून देतो. पूर्वनियोजित वेळेनुसार (अपॉइंटमेन्ट नुसार) आपण अनुरूपच्या या सेवेचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा. अनुरूपची तज्ज्ञांची टीमच तुम्हा सगळ्यांना मदत करण्यासाठी सज्ज आहे. या सगळ्याचा उद्देश हाच की, अनुरूपने 'इथे लग्न जमते' याचबरोबर 'इथे लग्न टिकते आणि फुलते' हेही उद्दिष्ट ठेवले आहे!